| 2 | 1. Mr. Kantilal Chaturbhuj Purohit (HUF) through its Karta Mr. Vinayak Kantilal Rajpurohit Prop. of M/s. Sagar Silk Mills, Principal Borrower 2. Mr. Vinayak Kantilal Rajpurohit, Son & Legal heir of Joint Borrower Late. Mrs. Leeladevi Kantilal Purohit & Joint/Co-Borrower 3. Mr. Kunal Kantilalji Rajpurohit, Son & Legal heir of Joint Borrower Late. Mrs. Leeladevi Kantilal Purohit & Surety 4. Mrs. Manju Rajendra Purohit, Daughter & Legal heir of Joint Borrower Late. Mrs. Leeladevi Kantilal Purohit 5. Mrs. Manisha Chhaganlalji Purohit, Daughter & Legal Heir of Joint Borrower Late. Mrs. Leeladevi Kantilal Purohit 6. Mrs. Mamta Mukesh Purohit, Daughter & Legal Heir of Joint Borrower Late. Mrs. Leeladevi Kantilal Purohit | **NPA Date:** 31.03.2026 **Notice Date:** 01.07.2026 | **Thane (West) Branch** **001613100000598** Rs.3,67,43,359/- outstanding as on 30.06.2026 with further interest & charges w.e.f 01.07.2026 | (i) Entire Current Assets comprising inter alia, Stocks of raw material, work in progress, finished goods, receivables, book debts and other current assets & (ii) Plant and machineries. (ii) AC Sheet Powerloom Gala No. 6 on the Ground floor admeasuring about 1750 sq. ft. built up area and Mezzanine floor admeasuring 1725 sq. ft. built up area in the building known as "Mahavir Compound", constructed on N.A land bearing survey No.9/2-A & 12/4, Plot No. 3 & 1, bearing Municipal House No. 379 at village Temghar, Taluka Bhiwandi, District Thane – 421 302 owned by Mr. Vinayak Kantilal Rajpurohit. (iii) AC Sheet Powerloom Gala No. 7 on the Ground floor admeasuring about 1750 sq. ft. built up area and Mezzanine floor admeasuring 1725 sq. ft. built up area in the building known as "Mahavir Compound", constructed on N.A. land bearing survey No.9/2-A & 12/4, Plot No. 3 & 1, bearing Municipal House No. 379 at village Temghar, Taluka Bhiwandi, District Thane – 421 302 owned by Mrs. Leeladevi Kantilal Purohit. |

Date : 14.07.2026 Sd/-
Place : Bhiwandi Authorised Officer
Bharat Co-operative Bank (Mumbai) Ltd.

## UGRO Capital Limited

UGRO CAPITAL

B-17, Fourth Floor, Art Guild House, Phoenix Market City, Kurla (West), Mumbai- 400070

**DEMAND NOTICE**

**UNDER THE PROVISIONS OF THE SECURITIZATION AND RECONSTRUCTION OF FINANCIAL ASSETS AND ENFORCEMENT OF SECURITY INTEREST ACT, 2002 ("THE ACT") AND THE SECURITY INTEREST (ENFORCEMENT) RULES, 2002, ("THE RULES")**

The undersigned being the authorised officer of **UGRO Capital Limited** under the Act and in exercise of the powers conferred under Section 13(2) of the Act, read with the Rule 3, issued Demand Notice(s) under Section 13(2) of the Act, calling upon the following borrower(s) to repay the amount mentioned in the respective notice(s) within 60 days from the date of receipt of the said notice. The undersigned reasonably believes that the borrower(s) are avoiding the service of the demand notice(s), therefore the service of the demand notice is being effected by affixation and publication as per the Rules. The contents of the demand notice(s) are extracted herein below:

| Sl.No. | Name of the Borrower(s) | Demand Notice Date and Amount |
|---|---|---|
| 1. | **1) CAB EEZ INFRA TECH PRIVATE LIMITED 2) KULDIP GHOSH 3) INDRANEEL CHAKRAVARTY LAN – UGMUMMC0000076472** | **Demand Notice date: 07/07/2026** **Notice Amount: 1,47,32,172/-** ( Rupees One Crore Forty Seven Lakh Thirty Two Thousand One Hundred Seventy Two Only) As on 07/07/2026 |

**Description Of Secured Asset(S):-** Model No: EC3 - FEEL - 2025,Make: La Maison citron pune,Invoice No: B4S/24-25/0211 | 28/02/2025

The borrower(s) are hereby advised to comply with the demand notice(s) and pay the demand amount mentioned therein and hereinabove within 60 days from the date of this publication together with applicable interest, late payment penalty, bounce charges, cost and expenses etc. till the date of realization of the payment. The borrower(s) may note that UGRO Capital Limited is a Secured Creditor and the loan facility availed by the borrower(s) is a secured debt against the immovable property(ies) being the secured asset(s) mortgaged by the borrower(s) with **UGRO Capital Limited.**

In the event, the borrower(s) are failed to discharge their liabilities in full within the stipulated time, **UGRO Capital Limited** shall be entitled to exercise all the rights under Section 13(4) of the Act to take possession of the Secured Asset(s) including but not limited to transfer the same by way of sale or by invoking any other remedy available under the Act and the Rules thereunder in order to realize the dues in the loan account of the borrower(s). UGRO Capital Limited is also empowered to **ATTACH AND/OR SEAL** the Secured Asset(s) before enforcing the right to sale or transfer. Subsequent to the sale of the Secured Asset(s), UGRO Capital Limited also has a right to initiate separate legal proceedings to recover the balance dues, in case the value of the Secured Asset(s) is insufficient to cover the dues payable by the borrower(s) to **UGRO Capital Limited.** This remedy is in addition and independent of all other remedies available to UGRO Capital Limited under any other law.

The attention of the borrower(s) is invited to Section 13(8) of the Act in respect of time available, to redeem the Secured Asset(s) and further to Section 13(13) of the Act, whereby the borrower(s) are restrained/prohibited from disposing or dealing with the Secured Asset(s) or transferring the same by way of sale, lease or otherwise (other than in ordinary course of business) any of the Secured Asset(s) without prior written consent from **UGRO Capital Limited** and non-compliance of the above is an offence punishable under Section 29 of the Act. The copy of the demand notice(s) is available with the undersigned and the borrower(s) may, if they so desire, collect the same from the undersigned.

**Place: ANDHERI MUMBAI MAHARASHTRA** **Sd/- (Authorized Officer)**
**Date: 14/07/2026** **For UGRO Capital Limited, authorised.officer@ugrocapital.com**

## COSMOS BANK

COSMOS CO-OP. BANK LTD. (Multistate Scheduled Bank)

**Recovery Department, Region-II**
**Correspondence Address : Horizon Building, 1st Floor, Ranade Road & Gokhale Road Junction, Gokhale Road (North), Dadar (West), Mumbai - 400 028. Phone No. 022- 69476008/57/58/12**

**E-AUCTION SALE NOTICE UNDER SARFAESI ACT, 2002**

E-auction Sale Notice for Sale of Immovable Secured Assets under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to Rule 8(6) & 9(1) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002.

Notice is hereby given to the public in general and in particular to the Borrower, Mortgagor & Guarantors that the below described immovable property mortgaged to the Secured Creditor, the possession of which has been taken by the Authorized Officer of Cosmos Co-operative Bank Ltd., will be sold on the basis of **"As is where is", "As is what is", "Whatever there is" and "Without Recourse"** for recovery of Bank dues as per the brief particulars given hereunder:

| Name of Borrower, Mortgagor & Guarantors | Details of Secured Assets for Sale/Auction |
|---|---|
| **Borrower/Mortgagor:** Mr. Nanasaheb Babanrao Humane **Guarantors:** 1. Mr. Sanjeev Waman Deshpande 2. Mr. Sandeep Eknath Hinge | All that piece and parcel of Flat No. 201, admeasuring 375 sq. ft.(34.83 Sq. Mtrs.) built-up area, situated on second floor in 'A' Wing of Om Vighnesh Co-op. Hsg. Soc. Ltd., constructed on piece and parcel of land bearing Survey No.342, Hissa No.2, situate, lying and being at Village Kalwa, in the Registration District and Sub-District of Thane, within the limits of Thane Muncipal Corporation, Near Muktidham, Damodar Vitawakar Marg, Vitawa, Kalwa, Thane - 400 605. |
| **Demand Notice Date & Amount** | Demand Notice Date 06/11/2024 of ₹ 9,11,124.23 plus further interest & charges thereon |
| **Possession Date & Type** | 29/01/2026 Physical |
| **Reserve Sale Price** | **₹ 19,20,000/- (Rupees Nineteen Lakhs Twenty Thousand Only)** |
| **Earnest Money Deposit (E.M.D.)** | ₹ 1,92,000/- (Rupees One Lakh Ninety Two Thousand Only) |
| **Bid Incremental Value** | ₹ 10,000/- (Rupees Ten Thousand Only) |
| **Date & Time of E-Auction** | 31/07/2026 from 1.00 pm to 2.00 pm |
| **Date & Time of Inspection** | 24/07/2026 from 11.00 am to 1.00 pm |

**STATUTORY NOTICE: As per Rule 8(6) & 9(1) of Security Interest (Enforcement) Rules, 2002.**

This notice also be considered as a 15 days' notice to the Borrower, Mortgagor & Guarantors of the said loan to pay the dues in full before the date of sale, failing which the secured assets will be sold on above auction date.

**Note: 1. EMD/BID forms are available with Authorised Officer, 2. Please contact for EMD payment & other details to Authorised Officer Mob.9960974848/9322480888/9819192192, 3. Last Date & Time of EMD and KYC Documents submission 30/07/2026 upto 4.30 p.m.**

For detailed terms & conditions of the auction sale is available with the Bank Website i.e. https://www.cosmos.bank.in/auction-notice.aspx AND Auctioneer Website i.e. https://cosmosbank.auctiontiger.net

**Sd/-**
**Chief Manager & Authorised Officer**
**Under SARFAESI Act, 2002**
**Cosmos Co-operative Bank Ltd.**

**Date: 14/07/2026**
**Place : Mumbai**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# वारकऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर

सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर वारीमय वातावरण आहे. राज्याच्या विविध भागांतून पंढरपूरकडे हजारो दिंड्या पायी चालत निघतात. त्यांचा हा प्रवास आता निम्म्यावर येऊन पोहोचला असतानाच जेजूरी देवस्थानाच्या रस्त्यावर वारकऱ्यांना झालेला दुर्दैवी अपघात अतिशय वेदना देणारा ठरतो. वारीचे जे नेहमीचे मार्ग आहेत, त्याठिकाणचे रस्ते आणि मोठ्या प्रमाणावर होणारी वाहतूक याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु बऱ्याच वेळेला ही वाहने वारीमध्ये घुसतात. तो गर्दीचा परिणाम असेल किंवा वाहन चालकाचा बेजबाबदारपणा असेल. परंतु या दुर्घटनांमध्ये वारकऱ्यांचे बळी जातात ही वस्तुस्थिती आहे. आतादेखील जेजूरी येथे मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला तर अनेक वारकरी जखमी झाले आहेत. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचे नियोजन हे त्या त्या दिंडीचे प्रमुख करीत असतात आणि वारीत सहभागी झालेले लोक शक्य तितक्या प्रमाणात स्वतःला जपण्याचा प्रयत्न करतात. परंतु दिंड्यांच्या मार्गावर वाहतूक किंवा एकूण वाहनांची संख्या लक्षात घेता एका मुक्कामापासून ते दुसऱ्या मुक्कामापर्यंत या दिंड्या सुरक्षितपणे पोहोचतील याची काळजी वाहतूक पोलिसांनी घेणे आवश्यक ठरते. ज्याअर्थी मागून येणारा ट्रक सरळसरळ धडक देतो याचा अर्थ तो रस्ता अरूंद असूनही त्या रस्त्यावरच्या वाहतुकीचे नियंत्रण करण्यात पोलीस अपयशी ठरलेले दिसतात. साधारणपणे रस्त्याच्या डाव्या बाजूने वारकरी चालत असतात. अशावेळी त्याच दिशेने येणाऱ्या वाहनांना अतिशय काळजीपूर्वक वाट करून देणे म्हणजेच वारकऱ्यांना त्याचा कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे ठरते. खरे तर एका शहराच्या पोलीस स्टेशनपासून दुसऱ्या पोलीस हद्दीपर्यंत वारीला सुरक्षितपणे पुढे नेण्याचे नियोजन आवश्यक असते. दुर्दैवाने या प्रकारचे काटेकोर नियोजन नसल्याने हा अपघात झालेला दिसतो. दोनच दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पुण्यात ज्ञानोबा, तुकोबांच्या पालखीचे दर्शन घेतले आणि वारीच्या सुखरूप प्रवासासाठी शुभेच्छाही दिल्या होत्या.

### वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्ये आषाढ वारीला एक आगळेवेगळे महत्त्व आहे. गेल्या अनेक शतकांची ही परंपरा आहे. परंतु साधारणतः गेल्या दहा वर्षांत वारीला जाणाऱ्यांच्या संख्येत पाचपट वाढ झाल्याचे दिसून येते. आतापर्यंत साधारणपणे दोन अडीच लाख वारकरी आषाढी एकादशीच्या या वारीमध्ये सहभागी होत असत. परंतु आता ही संख्या तब्बल बारा तेरा लाखांवर जाऊन पोहोचली आहे. आपल्या गावापासून किंवा वारीच्या मूळ ठिकाणापासून ते पंढरपूरपर्यंत सलग वारी करणाऱ्यांची संख्यासुद्धा वाढलेली आहे. मात्र त्याबरोबरच अनेक उत्साही विठ्ठलभक्त वारीचा छोटा मोठा अनुभव घेण्यासाठी पाच पंधरा मैल वारीसोबत चालत जातात. अशा थोड्या अंतरासाठी वारीमध्ये सहभागी होणाऱ्यांची संख्यादेखील दरवर्षी वाढते आहे. त्याचा परिणाम असा होतो की, वारीमध्ये सहभागी होणाऱ्यांच्या संख्येत केव्हा आणि कुठे कशा प्रकारची वाढ होईल हे सांगता येत नाही. अचानकपणे काही शहरांमध्ये किंवा गावांमध्ये मूळ वारकरी आणि काही अंतरासाठी सहभागी होणारे भक्त यांची संख्या वाढते आणि त्याचे नियोजन करणे काहीवेळेला अशक्य होत असावे. परंतु अनेक वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन पोलीस यंत्रणांनी वारीच्या गर्दीचा योग्य तो अंदाज घेणे आणि त्यानुसार वारीच्या सुरक्षिततेची उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते. जसे पुण्यामध्ये ज्ञानोबा आणि तुकोबांच्या पालख्या एकाचवेळी एकत्र येतात. संपूर्ण पुणे महानगर वारीमय झालेले असते. या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेऊन पुण्यात सगळ्या कार्यालयांना अधिकृतपणे सुट्टी दिली जाते. ज्या मार्गावरून वारी जाणार आहे तिथली वाहतूक अन्यत्र वळवली जाते. सासवडच्या पुढे वारी सुरक्षितपणे नेण्याचे काम पुणे पोलिसांना करावे लागते. परंतु शहर किंवा महानगराबाहेर पडल्यानंतर सगळे रस्ते हे दुपदरी किंवा चार पदरी असतात. सरकारने जरी पालखी महामार्ग हा मोठा करण्याचा निर्णय घेतला असला तरी त्या महामार्गापर्यंत नेऊन सोडणारे रस्ते हे अरूंदच असतात. या ठिकाणी अन्य वाहनांच्या रहदारीवर नियंत्रण ठेवणे हा एकमेव पर्याय शिल्लक राहतो.

### मंत्र्यांचे दौरे मात्र सुरक्षित


सरकार वारीसाठी ज्यादा गाड्या सोडणे, पंढरपुरात वारकऱ्यांची अधिकाधिक सोय पाहणे, या गोष्टी जरी करीत असली तरीसुद्धा वारकऱ्यांसाठी रोजचा प्रवास हा अधिक महत्त्वाचा असतो. दिंडीच्या आयोजनकर्त्यांकडून वारकऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या जात असतातच. वारकरीदेखील आपापल्या पद्धतीने स्वतःला सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतात. परंतु ज्या मार्गावरून या दिंड्या जाणार असतात, त्या मार्गावरचा वारीचा प्रवास सुरक्षित होण्याची जबाबदारी पूर्णपणे वाहतूक पोलिसांची असते. ट्रकच्या धडकेत तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू होणे याचा अर्थ वारकऱ्यांची एवढी गर्दी दिसत असूनही त्या वाहन चालकाने वाहनाचा वेग निश्चितच जास्त ठेवला असेल यात काही शंका राहत नाही. इतक्या वेगाने वाहन जात होते याचा अर्थ ते सुरक्षिततेसाठी कोणताही पोलीस फौजफाटा तिथे नव्हता हे आपोआप स्पष्ट होते. या घटनेने वारीच्या सुखरूप प्रवासाला गालबोट तर लागले आहेच. परंतु रस्त्यांवरची वारीची सुरक्षितता वाऱ्यावर असल्याचे त्यातून स्पष्ट होते. आता या प्रकाराची चौकशी होईल. ज्यांनी बेजबाबदारपणा केला त्यांच्यावर कारवाईदेखील होईल. परंतु आज सरकारी यंत्रणांकडे अनेक प्रकारच्या सोयीसुविधा आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करून रस्त्यावरच्या वाहतुकीवर लक्ष ठेवणे सहज शक्य आहे. तरीदेखील अशा प्रकारचा निष्काळजीपणा होत असेल तर ते निश्चितच गंभीर ठरते. ज्यावेळेला मंत्र्यासंत्र्यांचे दौरे असतात त्यावेळेला त्या त्या मंत्र्यांच्या गाड्यांचा ताफा सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनवर जबाबदारी सोपवली जाते. आणि त्या ताफ्याच्या सुरक्षिततेची काटेकोर काळजी घेतली जाते. हे नियोजन जसे मंत्र्यांच्याबाबतीत होऊ शकते. तसेच इतकी गर्दी असणाऱ्या वारीच्याबाबतीत का होऊ नये?

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

मातीतला ओलावा जसा झाडांची मुळं पकडून ठेवतो
तसं शब्दांतील गोडवा माणसातील नातं जपून ठेवतो.

## पंचांग



**मंगळवार, १४ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ अमावास्या**
**नक्षत्र : पुनर्वसू**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १८-४९ मिथुन**
**१८-५० ते २४.०० कर्क**

**रवी उदय- ०६-१०**
**रवी अस्त- १९-१८**

**दर्श अमावास्या, अमावास्या समाप्ती दुपारी ३.१३,**
**गोपाळ गणेश आगरकर जन्मदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### केळ्याचा पॅनकेक



**शाळा, कॉलेज असो किंवा अगदी ऑफिस डब्यामध्ये नक्की द्यायचं काय हा प्रश्न आपल्या सगळ्यांनाच पडतो. कारण- आपण जे डब्यात देतो, त्याचा मुलांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो. त्यामुळे आज आपण अशा एका पॅनकेकची रेसिपी पाहणार आहोत, जे खूपच हेल्दी आहे. त्यामुळेच आज आपण पॅनकेक कसा करायचा ते जाणून घेणार आहोत.**

★ **साहित्य :** ३०० ग्रॅम कणीक, २ ते अडीच वाट्या दूध+दुधावरची साय, ३/४ वाटी साखर, १/२ टिस्पून वेलची पूड, २ केळी, चिमूटभर मीठ, तूप गरजेनुसार.

★ **कृती :** - कणीक, केळी सोलून, वेलची पूड, दूध, मीठ, साखर एकत्र करून मिक्सरमधून काढून सरबरीत पीठ तयार करून घ्या. लागल्यास अजून दूध वापरा. गॅसवर डोशाचा तवा तापत ठेवून त्यात थोडे तूप घालून एक एक चमचा पिठ घालून झाकण ठेवून शिजवून घ्या.

दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. गरम गरम पॅनकेक सुकामेवा काप पसरवून सर्व्ह करा. मुलांना डब्यात द्या. नाश्त्याला खा. केळी आणि वेलचीचा स्वाद उत्तम लागतो.

## क्रीडा

# लॉर्ड्स कसोटीत भारताचा ऐतिहासिक विजय

## इंग्लंड संघाचा २७० धावांनी धुव्वा उडवला

**लॉर्ड्स मैदानावर खेळवल्या गेलेल्या एकमेव कसोटीच्या चौथ्या आणि शेवटच्या दिवशी आज भारतीय महिला संघाने इंग्लंडचा २७० धावांनी धुव्वा उडवला. कसोटीच्या पहिल्या डावात ११५ धावांची आघाडी घेणाऱ्या भारतीय संघाने यस्तिका भाटियाच्या शतकी खेळीच्या बळावर इंग्लंडसमोर विजयासाठी ४५७ धावांचे आव्हान ठेवले. या धावसंख्येचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांपुढे सपशेल नांगी टाकली आणि संपूर्ण संघ १८६ धावांनी गारद झाल्याने भारतीय संघाने ऐतिहासिक कसोटी जिंकली. भारतीय गोलंदाज स्नेह राणाने ६ आणि क्रांती गौडने ७ गडी बाद केले.**



■ लंडन

सलामीवीर स्मृती मंधानाच्या ८३, कर्णधार हरमनप्रीत कौरच्या ५८ आणि अष्टपैलू दीप्ती शर्माच्या ५७ धावांच्या जोरावर भारताने पहिल्या डावात २८५ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात इंग्लंडच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजांनी १७० धावांवर गुंडाळले. त्यामुळे भारताने पहिल्या डावात ११५ धावांची आघाडी घेतली होती. त्यानंतर दुसऱ्या डावातही भारतीय फलंदाजांनी चांगली कामगिरी केली. दुसऱ्या दिवसअखेर भारताने १ बाद १५४ धावा केल्या होत्या. त्यानंतर तिसऱ्या दिवशीही जबरदस्त फार्मात असलेली स्मृती मंधाना ७० धावांवर बाद झाली. त्यासोबत यस्तिका भाटियाने शतक ठोकून इंग्लंडच्या गोलंदाजांचे कबंरडे मोडले. मग जेमिमा रॉड्रिग्स (३), हरमनप्रीत कौर (१६), दीप्ती शर्मा (१०) यांचे झटपट विकेट गेल्यानंतर रिचा घोषने संघाचा मोर्चा सांभाळून अर्धशतक ठोकले. स्नेह राणा १ धाव करून माघारी परतली. डाव घोषित झाला तेव्हा रिचा घोष ५० आणि सायली सातघरे १८ धावा करून नाबाद राहिल्या. त्यामुळे भारताने दुसऱ्या डावात ७ बाद ३४१ धावा केल्या. त्यामुळे भारताने इंग्लंडसमोर विजयासाठी ४५७ धावांचे आव्हान ठेवले.

या धावसंख्येचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंजाजांनी दुसऱ्या डावात भारतीय गोलंदाजांपुढे गुडघे टेकले. टॅमी ब्यूमोंट (०), माया बुशियर (२), हेदर नाईट (१३), कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंट (११), ॲलिस कॅप्सी (२१), मॅडी व्हिलियर्स (२६) यांना फारसे काही करता आले नाही. काल दिवसअखेर इंग्लंडने ६ बाद १३० धावा केल्या होत्या. आज चौथ्या आणि शेवटच्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी आपली लय कायम ठेवली. स्नेह राणाने एमी जोन्सला ५४ धावांवर बाद करून मोठा अडथळा दूर केला. मग इस्सी वाँग (१)आणि लॉरेन बेल (०) एकामागून एक तंबूत परतल्या.

## आयडियल १४ वर्षांखालील बुद्धिबळ स्पर्धा १८ जुलैला

■ मुंबई

**आयडियल** स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुपतर्फे दि न्यू इंडिया ॲशुरन्स कंपनी लिमिटेड सहप्रायोजित १४ वर्षांखालील शालेय मुलामुलींच्या ६ वयोगटामध्ये बुद्धिबळ स्पर्धा १८ जुलै रोजी सकाळी ९ वाजल्यापासून परेल (पूर्व) येथील राष्ट्रीय मिल कामगार संघाच्या वातानुकुलीन सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक वयोगटात मुलांसाठी १० बक्षिसे व मुलींसाठी ५ बक्षिसे असे एकूण आकर्षक ९० पुरस्कार दिले जाणार आहेत. प्रतिवर्षाप्रमाणे जागतिक बुद्धिबळ दिनानिमित्त होणाऱ्या स्पर्धेस मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना व राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सहकार्य लाभले आहे.

न्यू इंडिया ॲशुरन्स-आयडियल जलद बुद्धिबळ स्पर्धा ८,९,१०,११,१२ आणि १४ वर्षांखालील ६ गटांत स्विस लीग पद्धतीच्या किमान ४ फेऱ्यांमध्ये रंगणार. प्रत्येक साखळी फेरी १५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. दोन गटामध्ये प्रथम पुरस्काराचा धमाका करणाऱ्या विजेत्यास विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनी दिली. संयोजकांतर्फे स्पर्धकांना बुद्धिबळ पट व घड्याळ दिले जाणार आहेत. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण किंवा मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी यांच्याकडे व्हॉट्सॲपवर १५ जुलैपर्यंत संपर्क साधावा.

## नाशिकची श्रावणी चमकली २ सुवर्णसह कांस्य पटकाविले

■ नाशिक

**चीनमधील** ऑर्डोस येथे आयोजित पहिल्या आशियाई २३ वर्षांखालील ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नाशिकच्या श्रावणी सांगळेने २ सुवर्ण आणि एक कांस्यपदक अशा ३ पदकांची कमाई करून ऐतिहासिक कामगिरी केली. मिश्र (मिक्स्ड) ४÷४०० रिले प्रकारात भारतीय संघाने सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत भारतीय संघ चीनमागे होता. मात्र शेवटच्या (अँकर) टप्प्यात श्रावणीने अफाट वेगाने चीनच्या धावपटूला मागे टाकले आणि भारताच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले.

## स्टिफन फ्लेमिंग चेन्नई सुपर किंग्सच्या मुख्य प्रशिक्षकापदावरून पायउतार

■ चेन्नई

**न्यूझीलंडचा** माजी कर्णधार स्टिफन फ्लेमिंग यांनी चेन्नई सुपर किंग्सच्या मुख्य प्रशिक्षकापदाचा राजीनामा दिला. चेन्नई सुपर किंग्स संघातील त्यांच्या १८ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा अंत झाला. या काळात संघाने ५ आयपीएल आणि २ चॅम्पियन्स लीग टी-२० विजेतेपद पटकावली.

फ्लेमिंग आता अमेरिकेतील आणि दक्षिण आफ्रिकेतील सुपर किंग्सच्या इतर फ्रँचायझींचे मुख्य प्रशिक्षकपदही सांभाळणार नाहीत. फ्लेमिंग २००८ च्या पहिल्या आयपीएल हंगामात खेळाडू म्हणून चेन्नई सुपर किंग्समध्ये दाखल झाले होते. २००९ मध्ये त्यांनी मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळली आणि सलग १७ वर्षे या पदावर कार्यरत राहिले. महेंद्रसिंग धोनी आणि फ्लेमिंग या जोडीने चेन्नई सुपर किंग्सला आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी फ्रँचायझींपैकी एक बनवले. फ्लेमिंग यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने १२ वेळा प्ले-ऑफ आणि १० वेळा फायनल गाठली. २०२३ च्या आयपीएल विजयानंतर चेन्नई सुपर किंग्सची कामगिरी काहीशी खालावली होती. गेल्या ३ आयपीएल हंगामात संघ प्ले-ऑफसाठी पात्र ठरू शकला नाही. पुढील वाटचाल फ्लेमिंग यांच्या निरोपानंतर आता फ्रँचायझी व्यवस्थापन आगामी हंगामासाठी नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात आहे.

**पश्चिम रेल्वे**
**एमएसडीएसएसच्या केंद्रीकृत रिसेटींगची तरतूद**
सि. डीएसटीई/उत्तर/मुंबई सेंट्रल, २रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८ आमंत्रित करीत आहेत **ई-निविदा क्र.: एसजी_२१७_२_३१७_डब्ल्यूए दिनांकः ०८.०७.२०२६ काम आणि ठिकाणः चर्चगेट-विरारः** मुंबई विभाग पश्चिम रेल्वेमध्ये कर्तव्यावर असलेल्या स्टेशन मास्टरद्वारे ऑटो हट्स आणि ओसीजमध्ये एमएसडीएसींच्या केंद्रीकृत रिसेटींगची तरतूद. **कामाचे अंदाजित मूल्यः** ₹२,९२,०८,४८४.७९/-. **ईएमडीः** ₹५,८४,२००/-. **ई-निविदा दस्तऐवज सादरीकरण बंद होण्याचा दिनांक आणि वेळ** : दि. ३१.०७.२०२६, १५.०० वा.पर्यंत, **ई-निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळः** दि. ३१.०७.२०२६ रोजी १५.३० वा. निविदा वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे पाहता येईल. 0356
आम्हाला लाईक कराः facebook.com/WesternRly

## विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत उद्या फ्रान्स व स्पेन भिडणार

■ टेक्सास

**डॅलस** स्टेडियमवर फिफा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत फ्रान्स आणि स्पेन यांच्यात उद्या बुधवारी मध्यरात्री १२.३० वाजता अत्यंत चुरशीची लढत होणार आहे. फिफा विश्वचषकाच्या इतिहासात फ्रान्स आणि स्पेन केवळ एकदाच (२००६ च्या राऊंड ऑफ १६ मध्ये) आमनेसामने आले होते, ज्यामध्ये फ्रान्सने ३-१ असा विजय मिळवला होता.

फ्रान्सच्या संघाने मोरोक्कोचा २-० असा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली. किलियन एम्बाप्पे आणि इब्राहिम कोनाटे यासारखे स्टार खेळाडू फ्रान्सची मुख्य ताकद आहेत. स्पेनने उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमवर २-१ असा रोमहर्षक विजय मिळवला. लॅमिन यामल आणि फॅबियन रुईझ या युवा खेळाडूंच्या जोरावर स्पेनने संपूर्ण स्पर्धेत आतापर्यंत उत्कृष्ट बचावात्मक आणि आक्रमक खेळ दाखवला आहे. या दोन्ही तगड्या संघांमध्ये आतापर्यंत खेळल्या गेलेल्या ३८ सामन्यांमध्ये स्पेनचे पारडे थोडे जड राहिले. स्पेनने १८ सामने जिंकले, तर फ्रान्सला १३ सामन्यांत यश मिळाले.

## भारत-इंग्लंड आजपासून एकदिवसीय मालिका सुरू

■ बर्मिंगहॅम

**भारत** आणि इंग्लंड संघांतील ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका उद्यापासून सुरू होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना बर्मिंगहॅम येथे भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता खेळवला जाणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या टी-२० मालिकेत इंग्लंडने भारताचा ४-० असा पराभव केल्यामुळे आता टीम इंडियाला या वनडे मालिकेत पुनरागमन करण्याची सुवर्णसंधी आहे. या मालिकेत शुभमन गिल भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवणार असून, श्रेयस अय्यर उपकर्णधार असणार आहे. टी-२० मालिकेनंतर आता अनुभवी फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली एकदिवसीय संघात परतत आहेत. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या पुनरागमनामुळे संघाची गोलंदाजी अधिक मजबूत झाली आहे.

**फॉर्म जी**

**स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण**
**मिटसोम एंटरप्रायजेस प्रायव्हेट लिमिटेड**
**पुणे, महाराष्ट्र येथे व्यापारविषयक कामकाज करणे**

(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उपविनियम (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | **ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड** **सीआयएनः** U65990MH1993PTC070326 **पॅनः** AAACG2968G |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | **नोंदणीकृत कार्यालयः**१३, ३रा मजला खेतान भवन १९८, जे टाटा रोड, चर्चगेट मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२० |
| ३. | वेबसाइटची युआरएल | उपलब्ध नाही |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | मुंबई |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | ही कंपनी गुंतवणूक, वित्तपुरवठा आणि वित्तीय सल्लागार सेवांच्या व्यवसायात कार्यरत आहे. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | निरंक - २०२२-२३ च्या उपलब्ध ताळेबंदाप्रमाणे. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | निरंक |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | तपशिल cirp.grevekinvestment@gmail.com या पत्त्यावर ईमेल पाठवून मिळवता येतील. |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे युआरएल वर उपलब्ध आहेत: | तपशिल cirp.grevekinvestment@gmail.com या पत्त्यावर ईमेल पाठवून मिळवता येतील. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | २८.०६.२०२६ (मूळ)<br>१३.०७.२०२६ (वाढीव)<br>२०.०७.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | ०८.०७.२०२६ (मूळ)<br>१६.०७.२०२६ (वाढीव)<br>२३.०७.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | १३.०७.२०२६ (मूळ)<br>२१.०७.२०२६ (वाढीव)<br>२८.०७.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | २३.०७.२०२६ (मूळ)<br>२३.०७.२०२६ (वाढीव)<br>३१.०७.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| १४ | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | २८.०७.२०२६ (मूळ)<br>२८.०७.२०२६ (वाढीव)<br>०३.०८.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| १५ | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | २७.०८.२०२६ (मूळ)<br>२७.०८.२०२६ (वाढीव)<br>०२.०९.२०२६ (पुढील मुदतवाढ) |
| १६ | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.grevekinvestment@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | माहिती उपलब्ध नाही |

**आयपीई - एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
**(पूर्वीचे नावः मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)**
**रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या त्यांचे संचालक**
**श्री. अतुल टंडन यांच्यामार्फत**
**ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत**
**आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021**
**एएफएची वैधताः ३१ डिसेंबर, २०२६**
दिनांकः १३ जुलै २०२६
ठिकाणः मुंबई
पत्रव्यवहारासाठी ईमेल - cirp.grevekinvestment@gmail.com